**दिवाणी किरकोळ अर्ज क. 689/2022 मधील नि.1 वरील आदेश**
**दत्तात्रय जगताप व इतर विरुध्द निरंक**
**CNR NO. MHBIO8001599-2022**

1. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन 1827 चे कलम 2 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

2. **अर्जदारांच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे.**

अर्जदार क. 1 आणि अर्जाच्या परिच्छेद क.6 मधील अर्जदार हे मयत अंबादास पि. लक्ष्मण जगताप यांची मुले असुन अर्जदार क.2 ही मयताची पत्नी आणि अर्जदार क. 3 व 4 या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयत अंबादास पि.लक्ष्मण जगताप यांचा मृत्यू **दि. 24.11.2017** रोजी झालेला आहे. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, अशी विनंती केली आहे.

3. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी दि. 08.11.2022 रोजी दै. माजलगाव टाईम्स (नि.क.09) या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले होते. तसेच तहसील कार्यालय, माजलगाव व ग्रामपंचायत कार्यालय नाकलगाव ता.माजलगांव जि.बीड येथे देखील जाहीर प्रगटन डकविण्यात आले होते, परंतू कोणीही आजपर्यत आक्षेप नोंदविला नाही.

4. अर्जदारांतर्फे अर्जदार क. 1 दत्तात्रय अंबादास जगताप यांनी त्यांचे अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क.10), ग्रामपंचायत कार्यालय नाकलगाव, ता.माजलगाव, जि.बीड यांनी दिलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्र नि.क.11, अर्जदारांच्या आधारकार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती तसेच अर्जदार यांचे पेपरमधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत नि.क.09 व जाहीरनामा दिल्याबाबतचा गोषवारा नि.क.6 अशी कागदपत्रे दाखल केली आहेत, जी अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय आहेत.

5. अर्जदारांच्या वारसाबद्दल कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे अर्जदार क. 1 ते 4 आणि अर्जाच्या परिच्छेद क.6 मधील अर्जदार क.1 हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे दिसुन येत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

1) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

2) अर्जदार क. 1 ते 4 आणि अर्जाच्या परिच्छेद क.6 मधील अर्जदार क.1 हे मयत अंबादास पि.लक्ष्मण जगताप यांचे कायदेशीर वारस आहेत असे घोषित करण्यात येते.

3) आवश्यक ती कोर्ट फिस दिल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

Digitally signed by
RANjANA
SUKHDEV GOSAVI
Date: 2023.01.13
15:00:56 +0530

दिनांक : 13.01.2023. **( सौ.आर.एस.गोसावी )**
ठिकाण : माजलगाव. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माजलगाव.

CERTIFICATE

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

Dictated on : 13/01/2023

Transcribed on : 13/01/2023

Checked & signed on : 13/01/2023

Sd/-

Date: 13/01/2023

S.M.Mandavkar

Marathi Stenographer

2nd Jt. Civil Court J.D.Majalgaon.